# सांस्कृतिक विभाग -,वार्षिक अहवाल - २०२४-२५

सन २०२४- २५ या शैक्षणिक वर्षातील सांस्कृतिक विभागामार्फत दिनांक २६ जून २०२४ रोजी राजर्षी छत्रपती शाहूमहाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.स्नेहल चव्हाण यांनी शाहू छत्रपती शाहूमहाराज यांनी समाजोपयोगी केलेल्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. दिनांक २१ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयाचा ३० वा वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मा. चंद्रकात लिंगायत साहेब यांनी महाविद्यालयाने केलेल्या विकासाचा आलेख सांगून, सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मा. खुशिराम मोरे, मा.नरेश पाचलकर, मा. सिद्धार्थ जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.येल्लुरे यांनी महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शक केले.दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून प्रा. सुभाष धोंगडे यांनी लोकशाहीत अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांची कार्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे यांनी उपस्थित विद्यार्थीनी मार्गदर्शक केले. दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी एफ.वाय. बी.ए., बी.कॉम. या वर्गांतील प्रवेशित विद्यार्थांसाठी स्वागत समारंभ या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सरचिटणीस मा.नरेश पाचलकर, मा. चंद्रकात लिंगायत साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.येल्लुरे, व सर्व प्राध्यापकांकडून प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. याशिवाय विद्यार्थ्यांनीही आपापली मनोगते व्यक्त केली. दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी प्रा.स्नेहल चव्हाण यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक कार्याचा माहिती व त्यांनी केलेले सामाजिक कार्यबाबत विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्याचबरोबर या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एम.ए.येल्लुरे यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्र उत्सवानिमित्त सरस्वती पूजन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान

Edit with WPS Office

दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले.  या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून प्रा.पी.पी. राठोड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारश्रृखलेतून निर्माण झालेले संविधान हे लोकशाहीच्या केंद्रस्थानी आहे. तसेच सर्वसामान्य मतदारही देशाला सर्वोच्च पदापर्यंत पोहोचू शकतात, असे सर्व हक्क आणि अधिकार देऊन त्यांच्या कर्तव्याची जाणीव ही संविधान करून देते, असे बहुमोल मार्गदर्शन केले. दिनाक ६ डिसेंबर २०२४  रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण  दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॅा. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार या विषयावर बोलताना प्रा. स्नेहल चव्हाण यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समतेसाठी खूप मोठे काम केले. संविधानामुळे भारताला बळकट लोकशाही दिलीच,  त्याचबरोबर सर्वांना समान अधिकार दिले आहेत, असे बहुमोल मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना  केले. दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगतातून  प्राचार्य डॉ. एम. ए. येल्लुरे यांनी डॉ. बाबासाहेब यांचे कार्य या विषयावरती बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बलशाही भारत निर्मितीच्या पाया घातला. त्याचबरोबर समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कामगार कल्याण, शिक्षण, देशभक्ती, स्त्री सन्मान, कायदे या सर्व क्षेत्रात त्यांनी केलेले काम खूप मोठे आहे, असे म्हणाले. सन २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून सांस्कृतिक विभागाच्यावतीने वार्षिक स्नेहसंमेलनाच्यानिमित्ताने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी प्रश्नमंजुषा, तर मंगळवार दिनांक २१ जानेवारी २०२५  रोजी टाय डे व सारी डे, तसेच बुधवार दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी खाना-खजाना, तसेच गुरुवार दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी पारंपरिक वेशभूषा दिवस,  शुक्रवार दिनांक २४  जानेवारी २०२५ रोजी रोज डे, मिसमॅच डे, आणि शनिवार दिनांक २५ जानेवारी  २०२५ रोजी ब्लॅक ॲन्ड व्हाईट डे व चॉकलेट  डे  अशा कार्यक्रमांचे  आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये प्रश्र्न मंजुषा कार्यक्रमात प्रथम क्रमांक : अमेय सावंत, साहिल बने (एस.वाय.बी.कॉम.), व्दितीय क्रमांक : अक्षय सावंत, सुमित सावंत (टि.वाय.बी.ए.), तर तृतीय क्रमांक : कु. सायली गुरव, कु. सिध्दी कस्पले ( टि.वाय.बी.कॉम.) या विद्यार्थ्यांनी पटकावला. दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी खाना-खजाना या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये प्रथम क्रमांक : कु. दीक्षा गांगण व

Edit with WPS Office

ग्रुप (एस. वाय.बी. कॉम.) शेवग्याची भाजी आणि भाकरी या मेनूस मिळाला, व्दितीय क्रमांक : कु.सायली गुरव व ग्रुप ( टि.वाय.बी.कॉम.)व्हेजिटेबल फ्रॅकीईस या मेनूस मिळाला. तर तृतीय क्रमांक : कु.कलिका जाधव व ग्रुप ( एस.वाय. बी.ए., एफ.वाय. बी.ए. ) चिकन भाकरी या मेनूस मिळाला व उत्तेजनार्थ साहिल नार्वेकर व ग्रुप (एफ.वाय.बी.कॉम.) शाबूदाणा वडा व रू - हब्जा सरबत या मेनूस मिळाला. कै. हरी तुकाराम खापणे सृस्तिप्रित्यर्थ राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले जाते. यावर्षी या स्पर्धेसाठी विविध विविध विद्यापीठांमध्ये सतरा निबंध आले होते. यामध्ये प्रथम क्रमांक कु. प्रगती मनिषा संजय शिंदे ( आठल्ये, सप्रे- पित्रे महाविद्यालय, देवरुख ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी ) या विद्यार्थिनीस मिळाला. तर व्दितीय क्रमांक कु. अनुराधा आनंदा डोंगरे ( देशभक्त आदंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स ॲन्ड सायन्स कॉलेज, यशवंतराव चिखली ता. शिराळा, जि. सांगली) या विद्यार्थिनीने मिळविला, तर तृतीय क्रमांक कु.साहिल दिलीप आग्रे ( पाटपन्हाळे आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, पाटपन्हाळे ता. गुहागर, जि. रत्नागिरी या विद्यार्थ्यांने मिळविला. दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी संविधान गौरव महोत्सवानिमित्त सांस्कृतिक विभागाच्यावतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु.निसर्गा पांडुरंग धावडे (एस. वाय. बी.कॉम .), द्वितीय क्रमांक कु.सज्ञानी समीर घागरे (एस. वाय. बी. ए .) तर तृतीय क्रमांक कु सायली संतोष गुरव (टी. वाय. बी. कॉम.)या विद्यार्थिनींनी पटकावला.

सन -२०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

प्रा. पी.पी.राठोड , डॉ. बी.टी.दाभाडे

( सांस्कृतिक विभाग )

Edit with WPS Office

Edit with WPS Office




दिनांक २६ जून २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त  विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.एम.ए येल्लुरे




दिनांक २१जुलै २०२४  रोजी महाविद्यालयाच्या ३० वर्धापन दिनानिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना  मार्गदर्शन करताना मा.चंद्रकात लिंगायत

Edit with WPS Office




दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी  लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त

' अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे सामाजिक कार्य '

या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.सुभाष धोंगडे सर




दिनांक  २० ऑगस्ट २०२४ रोजी स्वागत समारंभानिमित्त विद्यार्थ्यांना

शुभेच्छा  देताना संस्थेचे  सरचिटणीस मा.नरेश पाचलकर

Edit with WPS Office




दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस दीप प्रज्वलन करताना प्रा. एस. जी स्नेहल चव्हाण




दिनांक २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्राचार्य डॉ.एम.ए. येल्लुरे

Edit with WPS Office



दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी नवरात्रोत्सवानिमित्त सरस्वती देवीची पूजा  करताना एफ.वाय.बी.कॉम.या वर्गांतील विद्यार्थी सुहास नार्वेकर.




दिनांक २६ नोव्हेंबर २०२४  रोजी संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याबाबत मार्गदर्शन करताना प्रा.पी.पी. राठोड.

Edit with WPS Office



दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण - निर्माण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे  सामाजिक कार्य '   या विषयावर मार्गदर्शन करताना  प्रा. स्नेहल चव्हाण.




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी प्रश्न मंजूषा कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शक करताना डॉ. बी.टी.दाभाडे

Edit with WPS Office




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी टाय डे व सारी डे या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी.



वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी आयोजित केलेल्या खाना- खजाना या कार्यक्रमात मेनूचे उद्घाटन करताना परीक्षक.

Edit with WPS Office




वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी आयोजित केलेल्या पारंपरिक वेशभूषेतील विद्यार्थी- विद्यार्थिनी



दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे उदघाटन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. मनोहरजी खापणे साहेब.

Edit with WPS Office




दिनांक ८ फेब्रुवारी रोजी विविध गुणदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजापूर पोलीस स्टेशन येथील मा.




दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज  यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना डॉ.ए.डी.पाटील

Edit with WPS Office




दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभानिमित्त विद्यार्थीना मार्गदर्शन करताना प्रसिध्द कवी डॉ. एकनाथ पाटील

Edit with WPS Office




दिनांक :एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार जयंतीनिमित्त ग्रंथ  प्रदर्शन या कार्यक्रमाचे उद्घाटन करताना  प्रभारी प्राचार्य डॉ. पी.एस.मेश्राम व  प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यां व विद्यार्थिनी




दिनांक :१२ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ग्रंथ  प्रदर्शन कार्यक्रमातील ग्रंथांचे  वाचन करताना  विद्यार्थी व प्राध्यापक.

Edit with WPS Office




दिनांक : १४ एप्रिल २०२५ रोजी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथांचे वाचन करताना विद्यार्थी व प्राध्यापक.




दिनांक: १२ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथांचे वाचन करताना विद्यार्थी.

Edit with WPS Office




दिनांक : १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करताना प्रा. पी.पी.राठोड

Edit with WPS Office




दिनांक: १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण

वरिष्ठ लिपिक श्री.राजेश चव्हाण.

Edit with WPS Office




दिनांक: १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. पी. पी.राठोड.




दिनांक:१४ एप्रिल नमस्कार रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी .

Edit with WPS Office